ल्हा TODAY
सोमवार, १७ ऑक्टोबर २०११

दैनिक सकाळ

# अधिकाधिक हातांना काम देणाऱ्या शिक्षणाची गरज

## शरद पवार यांचे प्रतिपादन; बारामतीत विद्या प्रतिष्ठानचा वर्धापनदिन, उच्च शिक्षण विषयांवर डॉ. वाघमारे यांचे व्याख्यान

**बारामती, ता. १६ :** "शिक्षणाची नाळ ही समाजाच्या उत्पादकतेशी जोडणे आज गरजेचे आहे. नोकरी मिळण्यासोबतच ज्या शिक्षणाने समाजातील अधिकाधिक हातांना काम मिळेल असे शिक्षण देण्याची आज खरी गरज आहे," असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले.

येथील विद्या प्रतिष्ठानच्या ३९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. खासदार व माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे मुख्य व्याख्याते म्हणून या प्रसंगी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार, संस्थेचे उपाध्यक्ष विनोदकुमार गुजर, उपाध्यक्ष द. रा. उंडे, खजिनदार रमणिक मोता यांच्यासह संस्थेचे विश्वस्त व विभागप्रमुख या प्रसंगी उपस्थित होते.

शरद पवार म्हणाले, "शिक्षण देतांना समाजातील अधिकाधिक हातांना काम कसे मिळेल याकडे लक्ष पुरविण्याची गरज आहे. चीनमध्ये ज्या प्रमाणे सरकारने पुढाकार घेऊन उत्पादकता वाढविणाऱ्या कंपन्यांना जाणीवपूर्वक प्रोत्साहन दिले, त्याच धर्तीवर आता आपणही शिक्षण देताना समाजाची उत्पादकता वाढविणे गरजेचे आहे. मुलांना केवळ पुस्तकी शिक्षण देण्यासोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास प्रभावीपणे कसा होईल याची काळजी घेणे आता गरजेचे आहे. विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने सुरू असलेला हा ज्ञानयज्ञ केवळ या संस्थेपुरता मर्यादित न ठेवता आसपासच्या किमान आठ ते दहा शैक्षणिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या शाळांची निवड करून त्यांचा दर्जा वाढविण्यासाठी संस्थेतील विभागप्रमुखांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत."

'उच्च शिक्षण नवी दिशा : नवी आव्हाने' या विषयावर बोलताना डॉ. वाघमारे म्हणाले, 'जीवनाच्या विद्यापीठात नीट जगता यावे यासाठी आता 'आजीवन शिक्षण' ही संकल्पना रूढ झाली आहे. समाजाची सर्वांगीण प्रगती व्हावी यासाठी ज्ञानाधिष्ठित समाज गरजेचा आहे. बदलत्या काळात आता शिक्षणाची दिशा व परिभाषाही बदलली असून ती समजून घेणे गरजेचे आहे. आपल्याला मिळणाऱ्या पगाराच्या तुलनेत आपण किती काम करतो हे शिक्षकांनी तपासणे गरजेचे आहे. अमेरिकेप्रमाणेच शिक्षक व प्राध्यापकांच्या कामाचे मूल्यमापन होणे गरजेचे असून, काही दिवसांनी आपल्याला ही संकल्पना स्वीकारावीच लागणार आहे.'



**बारामती :** विद्या प्रतिष्ठानच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांनी 'उच्च शिक्षण नवी दिशा : नवी आव्हाने' या विषयावर प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'जागतिक पातळीवर विद्यापीठांच्या दर्जाबाबत जेव्हा तुलना होते, तेव्हा भारतीय विद्यापीठांचा नामोल्लेखही होत नाही, ही बाब आपल्याला या क्षेत्रात अजून खूप पल्ला गाठायचा आहे, याची जाणीव करून देणारी आहे. शिक्षणाच्या संकल्पना वेगाने बदलत असून जागतिक स्पर्धेमध्ये या संकल्पना आत्मसात करण्याची तयारी सर्वांनी ठेवण्याची गरज आहे.

या प्रसंगी लॉरेन्स विद्यापीठाचे डॉ. सूर्याजीराव भोसले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. "न्यूक्लिअर इंजिनिअरिंग' हा अभ्यासक्रम सुरू करणारी विद्या प्रतिष्ठान ही प्रमुख संस्था असून, यासाठी अत्यंत अत्याधुनिक स्वरूपाच्या चार प्रयोगशाळा नजीकच्या काळात उभारण्यात येणार आहेत," असे त्यांनी सांगितले.

दरम्यान 'नॅक'च्या धर्तीवर राज्यात 'सॅक' प्रणाली आणण्याबाबत राज्य शासन गांभीर्याने विचार करीत असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. दौंड तालुक्यातही विद्या प्रतिष्ठानची शाखा सुरू करण्याबाबत विचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. सुप्रिया सुळे यांनीही या प्रसंगी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे उपाध्यक्ष विनोदकुमार गुजर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर. के. पाटील यांनी डॉ. वाघमारे यांचा परिचय करून दिला. जयश्री कुलकर्णी यांनी पसायदान सादर केले.